(CNRMHSN110006962016)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२४४/२०१६**
**निशाणी २८ लगत**

**निशाणी ४६ वरील आदेशाप्रमाणे**

**फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा जादा सरतपास वकील श्री.व्ही.एस.दाणी यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१४. आता मला दिनांक १३/०६/२०२३ रोजीचा संचालक मंडळाचा ठराव नंबर ४(४) दाखविण्यात आला. सदरचा ठराव तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर कारखान्याचे संचालक यांची सही आहे. सदरची सही मी ओळखतो. सबब, सदर ठरावास **निशाणी क्र.४७** देण्यात येते.

१५. आता मला निशाणी ४२/१ सोबत आरोपी यांचा ऊस तोडणी वाहतुकीचा करार दाखविण्यात आला. त्याच्यावर आरोपी, जामीनदार, मुख्य शेती अधिकारी आणि कार्यकारी संचालक यांच्या सह्या आहेत. त्या सर्व सह्या मी ओळखतो. करारपत्रातील संपूर्ण मजकूर बरोबर आहे. (आरोपीतर्फे अशी हरकत घेण्यात आली की, सदर करारपत्रावर सदर साक्षीदाराची सही नसल्यामुळे ठरावाला निशाणी देण्यात येवू नये. फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचे करारपत्र योग्य ताब्यातून आलेले आहे. सदर करारपत्रावरील कार्यकारी संचालक व आरोपीच्या सह्या साक्षीदाराने ओळखलेल्या आहेत. सदर साक्षीदारास प्रस्तुत कामी साक्ष देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सबब, सदर करारपत्रास निशाणी देण्यात यावी. **आदेश –** सदरची हरकत अंतिम युक्तीवादाच्यावेळी विचारात घेण्यात येईल. साक्षीदार

यांनी कार्यकारी संचालक व आरोपी यांची सही ओळखून सदर करारपत्रातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे सांगितले आहे. सबब, सदर करारपत्रास **निशाणी क्र.४८** देण्यात येते.)

१६. निशाणी ४२/२ सोबत आरोपीचा खाते उतारा दाखविण्यात आला. सदर खातेउता–यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर खाते उता–यास **निशाणी क्र.४९** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

समक्ष श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.07.04 16:58:37 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०४/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी